International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# महाराष्ट्र राज्यातील वंजारी समाजाच्या सामाजिक – आर्थिक स्थितीचे अध्ययन

**प्राचार्य (डॉ.) ज्ञानेश्वर विष्णू गोरे[1], कु. स्वरुपा लक्ष्मण नागरे[2]**

[1]संशोधन मार्गदर्शक, प्राध्यापक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग व संशोधनकेंद्र, श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगाव राजा, जि. बुलढाणा (महाराष्ट्र)
[2]संशोधक विद्यार्थी, संशोधन मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग व संशोधनकेंद्र, श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगाव राजा, जि. बुलढाणा (महाराष्ट्र)

**प्रस्तावना:**

विविधतेने नटलेला देश म्हणून भारताची ओळख आहे. भारतात अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असणाऱ्या लोकांचा समावेश होतो. भारतामध्ये अनेक वैशिष्ट्यांपैकी जाती व्यवस्था हे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असल्याचे दिसून येते. व्यक्तीची जीवन पद्धती व सामाजिक संबंधाचे स्वरूप जातीनुसार कळते म्हणून जातिव्यवस्था भारतीय समाज रचनेचा पाया मांडला जातो. कोणत्याही समाजाची निर्मिती ही अनेक व्यक्ती एकत्रित येऊन समूहाने राहिल्याने होते.भारतीय समाजात अनेक जाती पोट जातीमध्ये बंदिस्त असल्याचे आढळते.महाराष्ट्रात 42 विमुक्त आणि भटक्या जमाती आढळतात. 28 भटक्या विमुक्त आणि 14 विमुक्त तसेच या 42 जमातीमध्ये सुमारे 200 पोटजाती आहेत.

स्वातंत्र्य मिळून बरीच वर्षे झाली असली तरीही आजही भारतीय समाजात विविध जाती-जमाती संबंधित वेगवेगळ्या प्रकारच्या आर्थिक सामाजिक समस्या दिसून येतात. भारतासारख्या लोकशाही राष्ट्रासाठी नक्कीच ही अभिमानास्पद गोष्ट नाही. स्वातंत्र्योत्तर काळात घटनात्मक तरतुदीमुळे भटकंती जमातींना शैक्षणिक पार्श्वभूमी नाही.जसं की प्राथमिक शिक्षण चांगल्या आणि दर्जेदार शिक्षणाची सरासरी खूपच कमी दिसून येते.

प्रख्यात अभ्यासक लक्ष्मण माने यांनी1990 मध्ये केलेल्या सर्वेक्षणात 89% भटके विमुक्त आणि केवळ अकरा टक्के केवळ 11 टक्के साक्षर असल्याचे दिसून येते.या भटक्या जातीतील एक जात म्हणजे वंजारी समाज होय. वंजारी समाज प्राचीन काळात बैलांच्या साह्याने धान्याचा वापर करणारा समाज म्हणून या समाजाची ओळख होती. त्याकाळी वनचारी म्हणून तो ओळखला जाई. वनचारीवरून पुढे 'वंजारी' हा शब्द रूढ झाला. आणि पुढे याच नावाने आता हा समाज ओळखला जातो. या समाजात प्रामुख्याने क्षेत्रीय व वैश्य हे दोन गट होते.मुळचा राजस्थानमधील असलेला हा वंजारी समाज कालांतराने महाराष्ट्र बरोबर कर्नाटक मध्य प्रदेश उत्तर प्रदेश गुजरात पंजाब हरियाणा मध्ये स्थलांतरित झाल्याचे आढळते.

**वंजारी जमातीचा इतिहास :**

महाराष्ट्रातील हिंदू धर्मात अनेक जाती आहेत. त्यातीलच एक महत्वपूर्ण असलेली ही वंजारी जमात होय.भटक्या जमातीची व्याख्या पुढीलप्रमाणेआहे :"भटके हे असे समुदाय आहेत ज्यांना पक्के घरनाही, त्यामुळे ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात राहतात. अनंत काळाच्या प्रवासापासून ते जिथे राहत होते ते ठिकाण. परंतु त्यांच्या उपजीविकेसाठी प्रवास केल्यानंतर त्यांना परत जाण्याची जागा नाही."

वंजारी समाजाची मुळे आपल्याला प्रामुख्याने राजस्थानमध्ये असल्याचे आढळून येतात. व्यापाराच्या दृष्टीने या समाजाने हळूहळू दुसरीकडे स्थलांतर केले. हा समाज मुख्यत: आपल्याला महाराष्ट्रा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, हरियाणा, पंजाब, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, आंध्र प्रदेश व गोवा या राज्यात कमी- जास्त लोकसंख्येने आढळून येतो. वंजारी समाजातील लाड व रावजी वंजारी या दोन पोट जाती असल्यानेएकता नसलेला, पण भारतातील एक प्रमुख क्षेत्रीय भटक्या जमाती होय.

भारतात विविध राज्यात सर्व जाती समाजासोबत मिळून-मिसळून जाणारा शेतकरी पशुपालन उपेक्षित टाकलेला व जाती व्यवस्थेचे चटके इतर क्षेत्रीय समाजापेक्षा सर्वात जास्त सहन केलेला समाज या कारणाने आरक्षण मिळाल्यामुळे आज प्रगती करत असलेला हा समाज ओळख पावत आहे थोडसं इतिहासात जाऊन बघितल्यास वंजारी समाजाचा शौर्य पराक्रमाचा त्यांचा स्वतःचा इतिहास आहे. वंजारी समाजातील लोक महाराणा प्रताप यांच्या सैन्यात मोठ्या प्रमाणात होते.

महाराणा प्रताप यांचे सरदार मल्लाव व फत्ता हे वंजारी समाजाचे होते. महाराणा प्रताप जेव्हा दिल्लीच्या बादशहाशी लढत होते, तेव्हा हाच वंजारी समाज तेथे शौर्याने लढत होता कारण महाराणा प्रताप यांचे प्रमुख सरदार मल्ला व फत्ता वंजारी हे निष्ठेने लढत होते. राजस्थानातील उदयपूर किल्ल्यामध्ये उभ्या असलेल्या त्यांच्या समाधी आजही त्यांच्या या अतुलनीय पराक्रमाची साक्ष देतात.

असा हा पराक्रमी परंतु देशोदेशी भटकंती करणारा वंजारी समाज हा त्या काळातील धूर्त लोकांनी भटका या नावाखाली बाजूला टाकला आणि काळाच्या ओघात मूळ ओळख विसरून एक उपेक्षित जमात म्हणून हा समाज उदयास आला आणि आज ही उपेक्षित राहिला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

महाराष्ट्र राज्यातील वंजारी समाजाच्या सामाजिक – आर्थिक स्थितीचे अध्ययन या संशोधन विषया अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील वंजारी समाजाच्या सामाजिक – आर्थिक समस्यांचे अध्ययन करून त्याची कारणमीमांसा करण्यासाठी तसेच संशोधन कार्याला योग्य दिशा मिळण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे :

1. महाराष्ट्रराज्यातील वंजारी जमातीतील लोक समुदायाच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्र राज्यातील वंजारी जमातीतील लोक समुदायाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. महाराष्ट्र राज्यातील वंजारी जमातीतील लोक समुदायाच्या सर्वांगीण सामाजिक – आर्थिक विकासासाठी धोरणात्मक उपाय योजना सुचविणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनाचा विषय महाराष्ट्र राज्यातील वंजारी समाजाच्या सामाजिक – आर्थिक स्थितीचे अध्ययन हा असून या विषयाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधानासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

**महाराष्ट्र राज्यातील वंजारी जमातीची सामाजिक स्थिती :**

वंजारी समाज बीड, नाशिक, बुलढाणा, वाशिम, अहमदनगर, जालना, परभणी, औरंगाबाद, उस्मानाबाद, अकोला या जिल्ह्यात संख्येने जास्त प्रमाणात आढळतो तर इतर जिल्ह्यांमध्ये संख्येने कमी आहे. महाराष्ट्रातील वंजारी समाजाचे राहणीमान रीतिरिवाज, रूढीपरंपरा आणि संस्कृती जवळपास हिंदू मराठा समाजाप्रमाणेच आहे. त्यांची बोलीभाषा मराठी

आहे. वंजारी समाजातील पुरुष बारबंडी शर्ट, धोतर फेटा पागोटा टोपी घालतात तर स्त्रिया नऊवारी पातळ,लुगडे,चोळी, झेंपर पाचवरी पातळ नेसतात व कपाळावर गोल कुंकु हळद लावतात. परंतु अलीकडे या समाजातील स्त्री – पुरुषांच्या राहणीमानात बदल होत असून ते आधुनिक पद्धतीचे वस्त्र परिधान करीत आहेत.

वंजारी समाजात बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे. ते गोत्र बाह्य विवाह करतात त्याचबरोबर लग्न समारंभात नवीन कपडे घेणे व देव कार्याची रीत आहे या समाजातील लोकांवर रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, संत तुकारामाची गाथा या ग्रंथांचा मोठा प्रभाव आहे. हिंदू धर्माच्या सर्व देवतांना हा समाज मानतो हिंदू धर्मातील सर्व सण उत्सव हा समाज साजरे करतो. वंजारी समाजातील स्त्रिया अजिबात मांसाहार करीत नाही. त्यांच्या घरात मास शिजवले जात नाही पुरुष इच्छेप्रमाणे मांसाहार करतात परंतु ते घराबाहेर स्वतः बनवून खातात मासाहर केलेली भांडी स्वतः धुवून स्वच्छ करून स्नान करूनच घरात प्रवेश करतात वंजारी समाज कितीही गरीब असला तरी भीक मागत नाही म्हणजेच वंजारी समाज गरीब असून देखील स्वाभिमानी जीवन जगत असल्याचे दिसून येते.

वंजारी समाजात हुंडा पद्धत मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असल्याचे दिसून येते मुलीकडले मुलाकडच्या लोकांना पैशाच्या स्वरूपात सोने-चांदीचे दागिने वस्तू भेट इत्यादीच्या स्वरूपात हुंडा देतात. अलीकडील काळातील सामाजिक साहित्यातून आणि संशोधकांच्या संशोधनातून असे दिसून येते की, विमुक्त भटक्या जमाती आजही मागास जीवन जगत आहेत . त्यांचे मूलभूत तसेच उदरनिर्वाहाचे प्रश्न आजही सुटलेले नाहीत.शिक्षणा अभावी या जाती जमाती अंधश्रद्धेच्या विळख्यात सापडलेल्या आहेत. त्याचबरोबर ते व्यसनाधीनतेला बळी पडत आहेत. म्हणूनच या विमुक्त भटक्या जमातींना जागृत करणे गरजेचे आहे.

ज्या समाजाला रानावनात राहणे, शेती करणे व शेतीपूरक व्यवसाय करून व उदरनिर्वाह करणे याशिवाय काहीही माहित नव्हते तो समाजात गल्ली ते दिल्ली पर्यंत राजकारण व समाजकारणात सक्रिय झाला आहे याचे उदाहरण म्हणजे माननीय बबनराव ढाकणे पाथर्डी हे केंद्रीय मंत्रिमंडळात राज्यमंत्री होते तर माननीय गोपीनाथ मुंडे हे भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष होते. सध्या या समाजाचे पाच ते सहा आमदार कार्यरत आहेत तसेच नागपूर विभाग, मराठवाडा विभाग, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मुंबई विभागातून वंजारी समाजाचे हजारो कार्यकर्ते आज राजकारणात सक्रिय आहे तसेच वंजारी समाजाच्या नावाने व कैलासवासी संत भगवानबाबा च्या नावाने अनेक संघटना महाराष्ट्र मध्ये स्थापन केले असून त्या समाज कल्याणासाठी आपला प्रभाव राजकारणावर दबाव गटासारखा पाडत आहेत. म्हणून सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाज सक्रिय झाल्याचे दिसून येते. यावरून महाराष्ट्रामध्ये भटक्या जातीमधील वंजारी समाजात काही उपशाखा असून हा समाज डोंगराळ ग्रामीण भागात जास्त प्रमाणात राहणारा असून या समाजातील लोक राजकारण व समाजकारणात पुढे येत असल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्र राज्यातील वंजारी जमातीची आर्थिक स्थिती :**

वंजारी समाजाचा मुख्य व्यवसाय शेती,पशुपालन, शेती पूरक व्यवसाय व मजुरी हे असून अलीकडील काळात शिक्षणामुळे यात बदल होत आहे. परंतु हा समाज ग्रामीण भागातील डोंगराळ माळरान व नापीक जमिनीमध्ये स्थिरावलेला असल्यामुळे त्यांची शेती कोरडवाहू स्वरूपाची आहे. त्यामुळे हा समाज शेती हंगाम संपला की ऊसतोड कामगार हमाल माथाडी कामगार म्हणून महाराष्ट्रभर किंवा महाराष्ट्र बाहेर रोजगारासाठी जातो.

महाराष्ट्रात संख्येने मोठा असणारा हा वंजारी समाज मूळचा राजस्थानचा असून व्यापाराच्या निमित्ताने भटकंती करून ते महाराष्ट्रात व इतर काही राजांच्या डोंगराळ भागात स्थिरावले. या समाजातील बहुतांश लोक शेती व शेतमजुरी करतात. महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात हा समाज आहे.महाराष्ट्रातील वंजारी लोक उसतोड कामगार, हमाल माथाडी, कामगार म्हणून मोठ्या प्रमाणात काम करतात. म्हणून हा समाज फारशी प्रगती करू शकला नाही. तसेच अलीकडील

काळातील शिक्षणाच्या प्रसारामुळे साहित्यिक, कवी,नोकरदार अधिकारी, राजकारणी, समाज सुधारक व उद्योगपती तयार होत असल्याचे दिसून येते.

अद्यापही महाराष्ट्रातील वंजारी समाज डोंगराळ व दुर्गम भागात राहत असल्यामुळे या समाजात कमालीचे दारिद्र बेकारी निरक्षरता दिसून येते तसेच हा समाज सामाजिक आर्थिक व राजकीय दृष्ट्या मागासलेला आहे म्हणून या समाजाच्या प्रगतीसाठी आधुनिक काळात संशोधन करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात या समाजाचे लोक जास्त प्रमाणात आहेत. म्हणून हा समाज आज महाराष्ट्रात कोणत्या परिस्थितीत जीवन व्यतीत करत आहेत त्याचा आढावा विविध व्यक्तीने केलेल्या अभ्यास आणि लेखनावरून घेता येऊ शकतो.

स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर ही विमुक्त भटक्यांना म्हणावा तसा न्याय मिळाला नाही ते आजही केवळ केवळ उदरनिर्वासाठी झगडत आहेत. या जमाती आजही आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणून आर्थिक विकास काय आहे याची ओळख करून देणे ही आजची खरी गरज आहे. विमुक्त भटक्या जमाती बहुतांशी डोंगरदऱ्यादरम्यान वास्तव्यास आहे. त्यांना आर्थिक विकासाचा गंधही नाही आणि अशा जाती जमातींना सोडून भारतीय अर्थव्यवस्था विकसित होणे शक्य नाही त्यांना कोणत्याही मूलभूत व पायाभूत सुविधा आजही उपलब्ध नाहीत. कोणत्याही शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही तसेच शासन दरबारी त्यांच्या सुधारण्यासाठी खास अश्या कोणत्याही योजना, तरतुदी नाहीत.अशा परिस्थितीत विमुक्त भटक्यांचा विकास कसा होणार असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहे.

समाजाच्या प्रगतीसाठी समाजातील बदल योग्य दिशेने होणे आवश्यक आहे परंतु आजही बहुसंख्य वंजारी समाज डोंगर दरम्यान व खेड्यात राहत असल्याने हा समाज जुन्याच रूढी परंपरांना चिकटून आहे. 21 व्या शतकातील माहिती व तंत्रज्ञानाचे वारे आजही या समाजापर्यंत पोहोचलेले नाही. आजही वंजारी समाजामध्ये पारंपरिक शेती व्यवसाय, शेतमजूर ऊसतोड, सरकारी, निमसरकारी नोकदार स्थानिक राजकारणी अल्प प्रमाणात सहकार यातच हा समाज ग्रुप पडलेला आहे फारच थोडे लोक जीवनाच्या नवीन क्षेत्रात पदार्पण करताना दिसत आहेत. वंजारी समाजाची बदलाची गतिमानता फारच मंद आहे या समाजाला अजूनही जीवनाची अनेक क्षेत्र माहित नाही.

बहुतांश वंजारी समाज शिक्षणापासून वंचित आहे त्यांना राहण्यासाठी पक्के घर नाही त्यांच्याकडे पुरेशा प्रमाणात जमिनी नाहीत रोजगाराच्या बारमाही संधी उपलब्ध नाही. शाश्वत असा कुठलाच आर्थिक आधार नाही तसेच व्यवसायासाठी भांडण नाही इत्यादी समस्यामुळे त्यांच्या व्यावसायिक शैक्षणिक आणि आर्थिक सामाजिक सांस्कृतिक व राजकीय प्रगतीचा प्रगतीचा मंद वेग असल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्र राज्यातील वंजारी जमातीतील लोकांच्या सर्वांगीण सामाजिक-आर्थिक विकासासाठी विशेष धोरणात्मक उपाय :**

1. वंजारी समाजातील जास्तीत जास्त लोक शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. त्यातही कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त असल्याने शेती हंगामानंतर हा समाज रोजगाराच्या शोधात भटकंती करीत असतो. तेव्हा शासनाने त्यांच्यासाठी स्थानिक पातळीवर कायमस्वरूपी रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी.
2. महाराष्ट्रातील बहुतांश वंजारी समाज डोंगर दर्यादरम्यान राहतो तेव्हा गाव पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाने मूलभूत सुविधांची निर्मिती करावी त्यात वीज, रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य केंद्र, बँका, संदेशवहन सुविधा इत्यादी ग्रामीण भागात उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने व्यापक प्रमाणावर प्रयत्न करावे
3. शासनाने सीमांत व लहान शेतकऱ्यांना मोफत व अनुदानावर शेतीची आधुनिक अवजारे व संकरीत बियाणे तसेच रासायनिक खते उपलब्ध करून दिली पाहिजेत.

4. वंजारी समाजातील लोकांना व्यवसायिक व कौशल्यपूर्ण शिक्षण, तांत्रिक शिक्षण व उच्च शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे अशा शिक्षणात विशेष सवलतीसह शासनाने त्यांना समजावून घ्यावे त्यामुळे त्यांना रोजगार प्राप्तीच्या नवीन नवीन संधी उपलब्ध होतील.
5. वंजारी समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेती व पूरक व्यवसायासाठी अल्प व्याज दराने दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून द्यावीत.
6. वंजारी समाजाकडील जास्तीत जास्त शेती कोरडवाहू आहेत तेव्हा सिंचन व्यवस्था वाढविण्यासाठी विहिरीत शेततळे कुपनलिका इत्यादी सिंचनाचे साधने अनुदान तत्त्वावर उपलब्ध करून द्यावे.
7. शेती हंगाम संपल्यानंतर वंजारी समाजातील बहुसंख्य लोक ऊस तोडणी साठी बाहेरगावी जात असतात. तेथे त्यांना राहण्याची आरोग्याची शिक्षणाची स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय मोफत उपलब्ध करून द्यावे तसेच ठेकेदारांकडून होणारे त्यांचे शोषण थांबवण्यासाठी शासनाने या मजुरांना कामगार कायद्यानुसार सुरक्षित संरक्षण द्यावे.
8. वंजारी समाजातील मुला मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण अधिक आहे. ही गळती थांबविण्यासाठी शाळेच्या वस्तीगृहाच्या सुविधेत वाढ करावी. त्याचबरोबर वाढत्या महागाईच्या प्रमाणात शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करावी.
9. परंपरागत सार्वजनिक सण, उत्सव, नवस इत्यादी वरील आवश्यक खर्च कमी केला पाहिजे. हा अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न प्रत्येक कुटुंबाने प्रामाणिकपणे केला पाहिजे.
10. अद्यापही वंजारी समाजात हुंडा देण्याची व घेण्याची कुप्रथा प्रचलित आहे तेव्हा शासनाने हुंडा विरोधी कायद्याची अधिक कडकपणे अमलबजावणी करणे आवश्यक आहे.
11. शासकीय योजनांची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तालुकास्तरीय व गाव पातळीवर यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.
12. भटक्या भटक्या विमुक्त जाती जमातीच्या सर्वांगीण विकासाकरिता रेणके आयोगाच्या शिफारशी शासनाने जशास तशा लागू करणे आवश्यक आहे.
13. आधुनिक काळात वंजारी समाजाच्या नियोजित विकासाकरिता राज्य पातळीवर एखादी तरी राजकारण विरहित सामाजिक संघटना स्थापन करणे गरजेचे आहे.
14. वंजारी समाजाचा राजकारणात वंजारी समाजाचा राजकारणातील सहभाग अत्यल्प आहे. तेव्हा या समाजाला राजकीय प्रतिनिधित्व देण्यासाठी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून ते लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत खास आरक्षणाची तरतूद करण्यात यावी.

**संदर्भसूची**:

1. पंजाबराव ढाकणे (19981): "वंजारी समाज : काल आज" (शोध निबंध),वार्षिक गोपिका दिवाळी अंक, 1998, संपादक : टी. के. तांदळे, पृष्ठ क्रमांक 23
2. कै. एडवोकेट देवराव ढाकणे (2007): "वंजारी समाजाची संस्कृती आणि इतिहास", लेखनाते समाजाशी भगवानगड, दुसरा विशेषांक (संपादक फड), पुणे. पृष्ठ क्रमांक 12
3. शामचरण दुबे (अनुवाद प्रकाश देशपांडे): "भारतीय समाज", नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली,प्रथम आवृत्ती 1998.
4. माने लक्ष्मण (1997): "विमुक्त्या - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती :'एक चिकित्सक अभ्यास," यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
5. खरात शंकर (2003):"भटक्या वविमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न," सुगावा पब्लिकेशन, पुणे

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

6. पिंपळे भीमराव (१९९०):"वनवासी व उपेक्षित जग" अभिनव जीवन पब्लिकेशन,बीड.
7. कुंभार नागोराव (2008):"विचारलं क" त्रैमासिक, स्नेहा ऑफसेट प्रकाशन,लातूर.
8. डॉक्टर प्रदीप आगलावे - सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे(श्री प्रमोद मुंजे विद्या प्रकाशन) रुईकर मार्ग नागपूर.
9. डॉक्टर वसंत मुंडे, "महाराष्ट्रातील वंजारी समाज" सविता प्रकाशन उस्मानाबाद प्रथम आवृत्ती 1998
10. केंद्रे बी. एस. "महाराष्ट्र राज्यातील वंजारी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास 1990 ते 2010" पी.एचडी प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, 2021
11. डॉ. वाघ राजेंद्र, "वंजारी समाज आणि आरक्षण" संत भगवान परिवार (संपादक मदन वनवे) पुणे- मासिक अंक 1999 पृष्ठ क्रमांक 89.\
12. श्री रामकृष्ण मुंडे, "क्षत्रिय वंजारी समाजाची ओळख." वंजारी परिवार (संपादकीय मदन वनवे) पुणे - अंक तीन अंक तिसरा वर्ष 2000 पृष्ठ क्रमांक 14 15.
13. मेंद बी. व्ही., "बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन" पी.एचडी प्रबंध, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद 2009.
14. पंजाबराव ढाकणे : "वंजारी समाज काल आणि आज" गोपिका दिवाळी अंक - 1998 बीड पृष्ठ क्रमांक 57
15. आ. तुकाराम डीघोळे, वंजारी समाज आणि बदललेली क्षितिजे" शोध निबंध मध्य प्रदेश वंजारी परिषद 2001 पृष्ठ क्रमांक 17.